महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:डीआरए-०९२१/प्र.क्र.४२/२०२३/जाहिरात दिनांक: ०६ फेब्रुवारी, २०२४

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय : सहयोगी प्राध्यापक / सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/शारिरीक शिक्षण संचालक, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (महाविद्यालयीन शाखा)**

**संदर्भ : जाहिरात क्रमांक- ११३/२०२३ व ११४/२०२३**

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्राप्त मागणीपत्रानुसार उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत शासकीय महाविद्यालय / संस्थेमधील सहयोगी प्राध्यापक / सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल/शारिरीक शिक्षण संचालक, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (महाविद्यालयीन शाखा) या संवर्गाच्या जाहिराती (अनुक्रमे ११३/२०२३ व ११४/२०२३) आयोगामार्फत दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

२. जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकानंतर, शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१९५/मशि-१, दिनांक १८ जानेवारी, २०२४ अन्वये **सहयोगी प्राध्यापक, गट-अ (जा.क्र.११३/२०२३) आणि सहायक प्राध्यापक/ग्रथपाल/शारिरीक शिक्षण संचालक (जा.क्र.११४/२०२३), महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ** या संवर्गाच्या आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातींच्या अनुषंगाने शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१९५/मशि-१, दिनांक ०८ मार्च, २०१९ मधील ४.४ येथे नमूद तरतुदीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, दिव्यांग उमेदवार व राज्याच्या यादीतील इतर मागास प्रवर्गात समाविष्ट असणाऱ्या जाती तसेच महाराष्ट्र राज्यातील ज्या जातींचा केंद्र शासनाच्या इतर मागास प्रवर्गाच्या यादीमध्ये समावेश आहे, त्या जातीतील उमेदवारांना पदव्युत्तर पदवीकरीता आवश्यक असलेल्या ५५ टक्के गुणांमध्ये ५ टक्के सवलत लागू आहे, असे अभिप्राय प्राप्त झालेले आहेत.

३. शासनाच्या उपरोक्त अभिप्रायास अनुसरुन, **सहयोगी प्राध्यापक, गट-अ आणि सहायक प्राध्यापक/ग्रथपाल/शारिरीक शिक्षण संचालक महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (अनुक्रमे जा.क्र.११३/२०२३ आणि जा.क्र.११४/२०२३)** या संवर्गाच्या जाहिरातींकरीता अर्हताप्राप्त ठरणाऱ्या उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत असून जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करावयाचा कालावधी** | **दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२४ रोजी १४.०० ते दिनांक १४ फेब्रुवारी, २०२४ रोजी २३.५९** |
| २ | **ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्याकरीता विहित अंतिम दिनांक** | **दिनांक १४ फेब्रुवारी, २०२४ रोजी २३.५९** |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक** | **दिनांक १६ फेब्रुवारी, २०२४ रोजी २३.५९** |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक १७ फेब्रुवारी, २०२४ रोजी २३.५९** |

४. वयोमर्यादा गणण्याचा दिनांक तसेच शैक्षणिक अर्हता आणि अनुभवाचा कालावधी हा संबंधित मूळ जाहिरातीमध्ये नमूद दिनांकानुसारच गणण्यात येईल.

५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या-१२, दिनांक ०३ मार्च, २०२३ अनुसार कमाल वयोमर्यादेत दोन वर्षे इतकी शिथिलता देण्यात येत आहे.

६. विषयांकित जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.

७. सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक ११३/२०२३ व ११४/२०२३ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.